दिल्लीतील आंदोलनकर्त्यांवरील लाठीचार्जच्या निषेधार्थ पालम कडकडीत बंद

अक्षराज : बालासाहेब फुलपगार

दि.२३, पालम (परभणी) : दिल्ली येथील जंतर-मंतरवर आंदोलन करणाऱ्या विद्यार्थी व आंदोलनकर्त्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ तसेच 'महाराष्ट्र बंद'ला पाठिंबा दर्शवित पालम येथे वंचित बहुजन आघाडीसह विविध पक्ष व संघटनांच्या वतीने कडकडीत बंद पाळण्यात आला. या बंदला पालम शहरातील व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याने बंद शांततेत पार पडला. बंद दरम्यान आंदोलनकर्त्यांनी पालम तहसीलदार यांना निवेदन सादर केले.

निवेदनात म्हटले आहे की, NEET पेपरफुटी प्रकरणामुळे देशभरातील विद्यार्थी, पालक आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर दिल्ली येथील जंतर-मंतरवर शांततापूर्ण आंदोलन सुरू असताना आंदोलनकर्त्यांवर करण्यात आलेल्या लाठीचार्जचा तीव्र निषेध करण्यात आला. लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या आंदोलनांवर अशा प्रकारे बळाचा वापर करणे लोकशाही मूल्यांना बाधा आणणारे असून, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच संबंधित केंद्रीय मंत्र्यांनी या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून आपल्या पदाचा तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे मंगेश धनसडे, रिपब्लिकन सेनेचे तालुकाध्यक्ष सूर्यकांत रायबोले, माधव हत्तीआंबिरे, सलमान पठाण, अरबाज पठाण, अविनाश हानवते, अनिल राठोड, हाकानी पठाण, साळवे, शंकर नरवाडे, राजू पठाण, सदाम शेख, राजकुमार जोंधळे यांच्यासह विविध पक्ष व संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, बंदच्या पार्श्वभूमीवर पालम पोलीस निरीक्षक लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

पालम बंदला काँग्रेसचा पाठिंबा; तहसीलदारांना निवेदन

दिल्ली येथे NEET पेपरफुटी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ पुकारण्यात आलेल्या पालम बंदला भारतीय राष्ट्रीय काँग्रेसनेही जाहीर पाठिंबा दिला. काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आंदोलनात सहभागी होत निषेध नोंदविला तसेच तहसीलदारांना निवेदन सादर केले.

यावेळी बोलताना पालम तालुका काँग्रेसचे अध्यक्ष माधवराव फाजगे यांनी लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या आंदोलनांवर बळाचा वापर करणे अत्यंत निषेधार्ह असल्याचे सांगितले. या प्रसंगी पालम तालुका काँग्रेस अध्यक्ष माधवराव फाजगे, अकबर खा पठाण, शहराध्यक्ष साबिर कुरेशी, वैजनाथ हत्तीआंबिरे, निवृत्ती हत्तीआंबिरे, माणिकराव असले, सुरेश मोडके, माधवराव चौरे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

थोडक्यात बातम्या

दिल्ली येथील विद्यार्थी आंदोलनातील अमानुष मारहाणीच्या निषेधार्थ सोयगाव बंद

अक्षराज : प्रतिनिधी

दि.२३, सोयगाव(छ.संभाजीनगर) : जंतर मंतर, दिल्ली येथील २० जुलैच्या विद्यार्थी आंदोलनात केलेल्या अमानुष मारहाण झालेल्या अन्यायाच्या विरोधात आणि चालू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या समर्थनार्थ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू व वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी गुरूवार, दिनांक २३ जुलै २०२६ रोजी महाराष्ट्र बंदची घोषणा केली आहे. त्यांच्या आदेशानुसार सोयगाव तालुका वंचित बहुजन आघाडीतर्फे सोयगाव बंदचे आयोजन करण्यात आले आहे. त्या आंदोलनास दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (भारतीय बौद्ध महासभा), समता सैनिक दल व भीम आर्मी सेना, रिपब्लिकन सेनेसह आंबेडकरीवादी समविचारी पक्ष संघटना, संस्था यांनी प्रचंड संख्येने शांततेच्या मार्गाने सहभागी होण्याचे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे पूर्व तालुका अध्यक्ष सचिन शिंदे, पश्चिम तालुका अध्यक्ष गणेश सोनवणे, तालुका समन्वयक मनोहर जगताप, भारतीय बौद्ध महासभा तालुका अध्यक्ष मुकुंदा वाहुळे, रिपब्लिकन सेना तालुका अध्यक्ष अंकुश पगारे, भीम आर्मी तालुका अध्यक्ष राजू वानखेडे, शेख बबलू व दीपक नवगीरे यांनी केले आहे.

दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील अमानुष मारहाणीच्या निषेधार्थ मनविसे चे पनवेलमध्ये तीव्र आंदोलन

अक्षराज : अभिनव येलवे

दि.२३, पनवेल (नवी मुंबई) : दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना (मनविसे) पनवेलच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरात तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व मनविसेचे जिल्हाध्यक्ष अमर पाटील यांनी केले. पनवेल परिसरातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होत विद्यार्थ्यांवरील कारवाईचा निषेध नोंदविला.

NEET परीक्षेतील कथित गैरव्यवहार आणि पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ देशभरातील विद्यार्थी मागील अनेक दिवसांपासून दिल्लीतील जंतर-मंतर येथे संविधानिक मार्गाने आंदोलन व उपोषण करत होते. आंदोलनकर्त्यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी केली होती. याच पार्श्वभूमीवर दिनांक २० जुलै २०२६ रोजी जंतर-मंतर ते संसद भवन अशी शांततापूर्ण रॅली काढण्यात येणार होती. मात्र, ही रॅली रोखण्यासाठी पोलिसांनी लाठीचार्ज केल्याचा तसेच अश्रुधूराचा वापर केल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांकडून करण्यात आला असून या घटनेत अनेक विद्यार्थी जखमी झाल्याचे सांगण्यात आले.

या घटनेच्या निषेधार्थ पनवेलमध्ये तीव्र निषेध आंदोलन आयोजित करण्यात आले आंदोलनाचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण आंदोलनात केवळ राष्ट्रध्वज तिरंग्याचा वापर करण्यात आला. कोणत्याही राजकीय पक्षाचा झेंडा न वापरता विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय एकात्मता आणि संविधानिक मूल्यांचे प्रतीक असलेल्या तिरंग्याखाली एकत्र येत विद्यार्थ्यांवरील कथित अन्यायाविरोधात आवाज उठविला.

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष अमर पाटील यांनी दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील कारवाईचा तीव्र निषेध व्यक्त केला. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी शासनाने स्वीकारावी तसेच संबंधित दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. त्याच बरोबर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान त्वरित राजीनामा द्यावा आणि विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्या मान्य कराव्या. विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना कायम संघर्ष करत राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांनी घोषणाबाजी करत विद्यार्थ्यांवरील कथित अत्याचारांचा निषेध व्यक्त केला. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे आणि अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

शिक्षणासोबत संस्कारही महत्वाचे - सिताराम खिलारी

अक्षराज : वसंत रांधवण

दि.२३, पारनेर (अहिल्यानगर) : आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर टाकळी ढोकेश्वर येथील ढोकेश्वर विद्यालयाच्या वतीने गावातून भव्य दिंडी व पालखी मिरवणूक काढण्यात आली. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये संत परंपरेचा वारसा, भक्ती, संस्कार, शिस्त, समता आणि सामाजिक ऐक्याची भावना रुजवणे हा आहे. बाजारतळावर मार्गदर्शन करताना संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी म्हणाले, शिक्षणाबरोबरच संस्कारही तितकेच महत्त्वाचे आहेत. संतांच्या विचारांचा आदर्श विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात घ्यावा आणि देशाचे चांगले नागरिक घडावेत. यावेळी त्यांनी पंढरीच्या विठ्ठलाच्या कृपेने राज्यात सर्वत्र चांगला पाऊस व्हावा, अशी प्रार्थनाही केली. कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयात विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्तींच्या पूजनाने झाली. या पूजनाला पारनेर तालुका खरेदी-विक्री संघाचे माजी अध्यक्ष ॲड.बाबाशेठ खिलारी तथा, प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. गणपती व विठ्ठलाची आरती झाल्यानंतर जय हरी विठ्ठल च्या जयघोषात दिंडी व पालखीचे गावात प्रस्थान झाले. विद्यार्थी टाळ, मृदुंगासह पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले होते. विठ्ठल, रुक्मिणी, तुकाराम महाराज, ज्ञानेश्वर महाराज यांसारख्या संतांची वेशभूषा विद्यार्थ्यांनी केली. माऊली माऊली या गीतावर विद्यार्थ्यांनी गोल रिंगण धरून भक्तिरसात तल्लीन केले. पालखी व दिंडी गावातील वेशीतून सुरू होऊन पारनेर रस्त्यावरील विठ्ठल मंदिरात दर्शनासाठी गेली. वाटेत सरपंच बाळासाहेब खिलारी, किरण झावरे, लक्ष्मण झावरे, अशोक वाळुंज, अनिल निवडुंगे, प्रशांत तराळ, पत्रकार संजय मोरे, भानुदास खिलारी, संपत तराळ यांच्यासह मान्यवरांनी पूजन करून दर्शन घेतले. मंदिरातील दर्शनानंतर दिंडीचा समारोप विद्यालयात झाला. हा दिंडी सोहळा यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

पारनेर तालुक्यात खतटंचाई नाही; शेतकऱ्यांना सुरळीत खत पुरवठा - कृषी विभाग सज्ज

अक्षराज : वसंत रांधवण

दि.२३, पारनेर (अहिल्यानगर) : खरीप हंगाम डोळ्यासमोर ठेवून पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना रासायनिक खतांचा अखंडित व सुरळीत पुरवठा व्हावा. यासाठी कृषी विभागाने मोठे नियोजन केले आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, कृषी विकास अधिकारी सुधीर शिंदे, यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक नियोजन केले आहे. तालुक्यात कोणत्याही प्रकारची खतटंचाई निर्माण होऊ नये तसेच शेतकऱ्यांना आवश्यकतेनुसार वेळेत खते उपलब्ध व्हावीत. यासाठी कृषी विभाग सातत्याने देखरेख व समन्वय ठेवून कार्यरत आहे.

तालुका कृषी अधिकारी गजानन घुले यांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या तालुक्यात युरिया खताचा २८८ मेट्रिक टन संरक्षित साठा उपलब्ध असून त्याचे नियोजनबद्ध वाटप सुरू आहे. तसेच विविध कंपन्यांच्या ४६० मेट्रिक टन खतांचा पुरवठा करण्यात आला असून पुढील साठाही टप्प्याटप्प्याने उपलब्ध होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी खतांच्या उपलब्धतेबाबत कोणतीही चिंता करू नये, असे आवाहन त्यांनी केले. कृषी विभागाने खत उत्पादक कंपन्या, अधिकृत खत विक्रेते व संबंधित अधिकाऱ्यांच्या समन्वयातून संपूर्ण नियोजन केले आहे. प्रत्येक खत विक्री केंद्रावर पुरेसा साठा उपलब्ध राहील, यासाठी दक्षता घेण्यात येत असून शेतकऱ्यांना कोणताही त्रास होऊ नये. यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

खत खरेदी करताना शेतकऱ्यांनी आधार कार्ड व मोबाईल क्रमांक सोबत ठेवावा. सर्व खतांचे वाटप पीओएस (झजड) मशीनद्वारे केले जात असून प्रत्येक व्यवहाराची ऑनलाइन नोंद होत आहे. कोणत्याही प्रकारची लिंकिंग न करता आधार कार्ड व मोबाईल क्रमांकाच्या आधारे युरिया व इतर खतांचे वितरण करण्यात येत असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. शेतकऱ्यांनी अधिकृत विक्रेत्याकडूनच खत खरेदी करून पावती घ्यावी. तसेच कोणत्याही विक्रेत्याने जादा दराने खत विक्री करणे, सक्तीने इतर उत्पादने खरेदी करण्यास भाग पाडणे अथवा अन्य अनियमितता आढळल्यास तात्काळ कृषी विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी झालेल्या बैठकीस कृषी उपविभागीय अधिकारी आशिष दिवटे, सहाय्यक कृषी अधिकारी योगेश रोहकले, मंडळ कृषी अधिकारी, गुणनियंत्रण अधिकारी, खत उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी तसेच खत विक्रेते उपस्थित होते. आगामी खरीप हंगामात शेतकऱ्यांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

तालुक्यात युरिया खताचा २८८ मेट्रिक टन संरक्षित साठा उपलब्ध असून त्याचे नियोजनबद्ध वाटप सुरू आहे. विविध कंपन्यांच्या ४६० मेट्रिक टन खतांचाही पुरवठा करण्यात आला आहे. शेतकऱ्यांनी घाबरून न जाता आवश्यकतेनुसारच खत खरेदी करावे.

- गजानन घुले (तालुका कृषी अधिकारी, पारनेर)

कोणत्याही प्रकारची लिंकिंग न करता आधार कार्ड व मोबाईल क्रमांकाच्या आधारे पीओएस मशीनवरून युरिया व इतर खतांचे वाटप सुरू आहे. शेतकऱ्यांनी नॅनो युरियाचाही वापर करून कृषी विभागाला सहकार्य करावे. पिकांच्या गरजेनुसारच खतांचा वापर करावा.

- अविनाश पायमोडे (श्री ढोकेश्वर कृषी उद्योग समूहाचे, संचालक)

रस्त्यातील खड्ड्यांचे करायचे काय?; पनवेल प्रशासनाला नागरिकांचा संतप्त सवाल

अक्षराज : अभिनव येलवे

दि.२३, पनवेल (नवी मुंबई) : ओल्ड पनवेल रेल्वे स्थानकापासून ते विचुंबे या मार्गावरील रस्त्यांची दुरवस्था दिवसेंदिवस वाढत असून ठिकठिकाणी पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमुळे वाहनचालक आणि नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर या रस्त्यांची अवस्था आणखी बिकट झाली असून प्रशासनाच्या उदासीनतेविरोधात नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या मार्गावर दुचाकी, रिक्षा, चारचाकी वाहने तसेच शाळकरी विद्यार्थ्यांची वाहने मोठ्या प्रमाणात ये-जा करतात. मात्र रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. पावसाचे पाणी खड्ड्यांमध्ये साचत असल्याने खड्ड्यांचा अंदाज येत नाही आणि अपघाताचा धोका वाढला आहे. विशेषतः दुचाकीस्वारांना मोठी कसरत करत वाहन चालवावे लागत असून अनेकदा किरकोळ अपघातही घडत असल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली. पावसाळा सुरू होऊन महिन्याहून अधिक कालावधी लोटला असतानाही संबंधित विभागाकडून रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नागरिकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. रस्त्यातील खड्ड्यांचे करायचे काय? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. याशिवाय या मार्गावर अनेक ठिकाणी पथदिव्यांची सुविधाही नसल्याने रात्रीच्या वेळी वाहन चालविणे अधिक धोकादायक ठरत आहे. अंधार आणि खड्डे यामुळे अपघाताची शक्यता वाढली असून नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. संबंधित प्रशासनाने तातडीने रस्त्यांची दुरुस्ती करून खड्डे बुजवावेत तसेच पथदिव्यांची व्यवस्था करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही काही नागरिकांनी दिला आहे.

ढोकेश्वर महाविद्यालयाच्या प्रा.गडगे यांना पी.एच.डी.

अक्षराज : वसंत रांधवण

दि.२३, अहिल्यानगर : श्री ढोकेश्वर महाविद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथील इतिहास विभागाच्या प्राध्यापिका प्रा. शांता गडगे यांना इतिहास विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील निवडक मराठी व हिंदी चित्रपटामधून दिसून येणारे महिला सबलीकरण : एक चिकित्सक अभ्यास (१९४७-२०१०) या विषयावर त्यांनी संशोधन केले आहे. या प्रबंधात स्वातंत्र्यानंतरच्या १९४७ ते २०१० या कालावधीतील मराठी व हिंदी चित्रपटांमधून प्रतिबिंबित होणाऱ्या महिला सक्षमीकरणाच्या विविध पैलूंचा अभ्यास करण्यात आला आहे. चित्रपट माध्यमातून स्त्रीची बदलती सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक भूमिका तसेच सक्षमीकरणाच्या संकल्पनेचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून आढावा या संशोधनात घेण्यात आला आहे. हे संशोधन अ.जि.म.वि.प्र.स. अहिल्यानगर संस्थेच्या न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथील संशोधन केंद्रात डॉ.मीना साळे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले. इतिहास, चित्रपट अभ्यास आणि स्त्री-अभ्यास या क्षेत्रांतील संशोधकांसाठी हा प्रबंध महत्त्वाचा ठरणार आहे. प्रा.गडगे यांच्या या यशाबद्दल अ.जि.म.वि.प्र.स. संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ.विवेक भापकर, सचिव ॲड.विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव मुकेशदादा मुळे, खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे, ज्येष्ठ विश्वस्त सितारामजी खिलारी, गव्हर्निंग कौन्सिल सदस्य डॉ.भाऊसाहेब खिलारी यांच्यासह प्राचार्य डॉ.लक्ष्मणराव मतकर, उपप्राचार्य डॉ.वीरेंद्र धनशेट्टी, सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.